# विधी अधिकारी भरती

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्राकरिता खालील जिल्ह्यासमोर दर्शविल्याप्रमाणे त्याठिकाणी विधी अधिकारी व विधी अधिकारी गट (ब) पदे मंजूर असून सदर पदे ११ महिन्याकरिता कंत्राटी पध्दतीनुसार भरावयाची आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | विधी अधिकारी-ब | विधी अधिकारी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| ०१. | कोल्हापूर | ०० | 01 | 01 |
| ०२ | सांगली | ०० | ०३ | ०३ |
| ०३ | सातारा | ०० | ०६ | ०६ |
| ०४ | सोलापूर ग्रामीण | ०० | ०३ | ०३ |
| ०५ | पुणे ग्रामीण | ०१ | ०८ | ०९ |
| | एकुण | ०१ | २१ | २२ |

याबाबतची सविस्तर जाहिरात पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाच्या www.kolhapurpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

०१. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी / विधी अधिकारी गट ब या पदासाठी अर्ज असे स्पष्ट नमूद करुन दोन रंगीत फोटो अर्जासोबत जोडून ते सदरची जाहीरात प्रसिध्द झाले दिनांकापासून १५ दिवसांचे आत पोलीस अधीक्षक कार्यालय, रमणमळा, कसबा बावडा, कोल्हापूर - ४१६००३ या पत्त्यावर पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी पत्रव्यवहाराकरिता अर्जासोबत स्वतःचे संपूर्ण नांव व पत्ता लिहिलेले दोन लिफाफे जोडावेत.

०२. या कार्यालयामार्फत दिनांक १२.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्यांनी नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

०३. विधी अधिकारी गट-ब करिता रक्कम रुपये २५,०००/- अधिक दूरध्वनी व प्रवास खर्च रु.३,०००/ असे एकूण रु.२८,०००/- व विधी अधिकारी यांचेकरिता रक्कम रुपये २०,०००/- अधिक दूरध्वनी व प्रवास खर्च रु.३,०००/- असे एकूण रु.२३,०००/- इतके मानधन देय राहील.

०४. निवडीनंतर उमेदवारांनी प्रत्येक आठवड्यात किमान ३० तास काम करणे आवश्यक आहे.

०५. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधारक, सनदधारक असावा व दोन्ही पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

०६. दोन्ही पदांसाठी उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

०७. संपूर्ण निवड प्रक्रिया ही लेखी परिक्षा- ५० गुण व मुलाखत - २५ गुण अशी एकूण ७५ गुणांची असेल. त्यामध्ये किमान ६०% गुण असणे आवश्यक राहील.

०८. अर्ज छाननीनंतर लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल. त्यासाठी उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

०९. कर्तव्य व जबाबदा-या तसेच अटी व शर्ती बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१०. उमेदवारांनी विहीत शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहिरातीच्या दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे.

११. नियुक्ती केलेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा करुन देणे अनिवार्य राहील व त्याचा खर्च उमेदवाराने करणेचा आहे.

तसेच जाहिरातीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती, अर्जाचा नमुना, भरतीची कार्यपध्दती याबाबतची सविस्तर माहिती पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाच्या www.kolhapurpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामधील माहितीची परिपूर्ण खात्री करुनच उमेदवारांनी आपले अर्ज पाठविण्याचे आहेत.

सही/-
(महेंद्र क. पंडित भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.

डीजीआयपीआर / 2024-25 /क्र-5/ C4798

Mahabharti.in